मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील प्राप्त निकालानुसार जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदलीने पदस्थाना देणेबाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
शिक्षण विभाग प्राथमिक
जा.क्र.कार्या-१/पीई-६/७८/२०२१
अहमदनगर दिनांक १/ /२०२१
०८/११/२०२१

वाचा- १) महाराष्ट्र शासन,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,शासन निर्णय क्रमांक जिपब-४८१७/ प्र.क्र.७/आस्था-१४,दिनांक २७/०२/२०१७

२) महाराष्ट्र शासन,ग्रामविकास व जलसंधारण विभाग,शासन पुरकपत्र क्र.जि.प.ब-४८१९/ प्र.क्र.३७३/आस्था-१४, दिनांक २८/०५/२०१९

३) मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडील याचिका क्र.७२३०/२०२१ चा प्राप्त निकाल दिनांक १३/०८/२०२१

४) मा.उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील निकालाचे अनुपगाने दि.२८/०९/२०२१ रोजी झालेली सुनावणी .

५) श्रीम.कार्ले संगिता शंकर,उपाध्यापक यांचा दिनांक ०८/११/२०२१ रोजीचा प्राप्त विनंती अर्ज.

उपरोक्त विषयानुसार संदर्भ क्रमांक १ चे शासन निर्णयानुसार राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या संगणकीय पध्दतीने जिल्हांतर्गत बदली प्रक्रिया शासन स्तरावरुन पार पाडण्यात येत आहे. मात्र जिल्हांतर्गत बदल्यासंदर्भात खालील प्राथमिक शिक्षकांनी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेली आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सदर याचिकेसंदर्भात दिलेल्या निकालाचे अनुषंगाने मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार खालील शिक्षकांना वरील संदर्भ क्र.५ चे विनंती अर्जान्वये त्यांनी केलेल्या मागणीचे ठिकाणी बदलीने पदस्थापना देणेत येत आहे.

अ.क्र.	शिक्षकाचे नाव	पदनाम	सध्याची शाळा व तालुका		दिलेली शाळा व तालुका	
१	२	३	४		५	
१	श्रीम.कार्ले संगिता शंकर	उपाध्यापक	जोगेवाडी	पाथर्डी	शिंगवे केशव	पाथर्डी

अटी व शर्ती-

१. सदरची बदली मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दाखल याचिकेच्या निकालपत्राचे अनुषंगाने करणेत आलेली आहे.

२. सदरची विनंती बदली असलेने बदली ठिकाणी हजर होणेकरती पदग्रहण अवधी व बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय नाही.

३.सदरचे बदलीने पदस्थापना समुपदेशन प्रक्रियेव्दारे व आपण मागणी केलेल्या ठिकाणी झालेली असलेने बदलीने दिलेल्या पदस्थापनेचे ठिकाणी कार्यमुक्त केलेनंतर तात्काळ हजर होणे आपणास बंधनकारक राहील.

४.बदली ही संपुर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे कोणत्याही कर्मचायाने राजकीय दबाव वापरल्यास म.जि.प.जि.से.(वर्तणुक) नियम ६ (५) चा भंग केला म्हणुन ती कृती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्र. 202111171601132 असा आहे.

(राजेंद्र क्षीरसागर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

Scanned by CamScanner

प्रतिः- संबंधीत प्राथमिक शिक्षकास व्दारा गट शिक्षणाधिकारी, संबंधीत पंचायत समिती नेवासा यांचेमार्फत.
प्रतः- गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती - पाथर्डी

२/- संबंधीत प्राथमिक शिक्षकास बदलीचे ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात येऊन अहवाल या कार्यालयास सादर करणेत यावा.

प्रतः- गट शिक्षण अधिकारी,पंचायत समिती...पाथर्डी.....

२/-संबंधीत प्राथमिक शिक्षकास बदलीचे शाळेवर हजर करुन घेऊन हजर अहवाल तात्काळ याकार्यालयास सादर करावा.

(राजेंद्र क्षीरसागर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

Scanned by CamScanner